२०१४-२०१५

MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION
महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग
सत्यमेव जयते
Life • Liberty • Equality • Dignity


# महाराष्ट्र राज्य
# मानवी हक्क आयोग



## १४ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २०१४ -३१ मार्च २०१५


MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION, MUMBAI
HUMAN RIGHTS DAY


MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION, MUMBAI
HUMAN RIGHTS DAY
10th December 2014
Celebrating 20 years




Celebrating 20

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## १४ वा वार्षिक अहवाल

## एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५

२०१४ - १५

## प्रस्तावना

**लोकांना त्यांचा मानवाधिकार नाकारणे ही त्यांच्या मानवतेला आव्हान देणे आहे.**

**नेल्सन मंडेला**

मानवाधिकारांचे संरक्षण ही जागतिक चिंतेची बाब आहे. युएनओ, युएनसीएचआर आणि मानवाधिकार आयोग, १९९३ भारतात मानवी हक्क कायदा १९९३ अंतर्गत स्थापना करण्यात आली. मानवाधिकार आयोगाने जनसेवकाकडून होणाऱ्या नागरिकांवर मानवी हक्काच्या बाबतीत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्याच्या दिशेने मानवाधिकार आयोगाकडून प्रयत्न केले जातात. या कायद्यानुसार मानवी अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या लोकसेवकांच्या विरूद्ध राज्य सरकारला चौकशी करण्यास व कार्यवाही करण्यास शिफारसी करण्यासाठी मानवाधिकार आयोगाला अधिकार बहाल करण्यात आले आहे व जनसेवकां विरूद्ध कार्यवाही करण्यास शासनास अधिकार देण्यात आले आहे. पायाभूत सुविधा, कर्मचारी वर्ग असूनही सन्माननीय सदस्याची अपुरी संख्या असूनही आयोगाने निश्चित केलेल्या ध्येयाच्या दिशेने काम करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. आयोगाला प्रचंड प्रलंबित प्रकरणाची जाणीव आहे आणि पुढील वर्षात सर्व जुन्या प्रलंबित प्रकरणांची पूर्तता करण्याची दृष्टी ठेवून वाटचाल करण्याची तयारी आहे.

मानवी हक्क अधिकार अधिनियम, १९९३ च्या कलम २८ च्या तरतुदी अनुसार विधानसभेसमोर २०१४ ते २०१५ या वर्षाचे १४ व्या वार्षिक अहवालास सादर करण्यास आम्हाला आनंद वाटतो.

**(भगवंतराव डी. मोरे)**
मा. सदस्य

**(न्यायाधीश एस. आर. बन्नूरमठ)**
मा. अध्यक्ष

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रस्तावना | पान क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | आयोगाने हाताळलेली प्रकरणे | ४ |
| ३. | मा. अध्यक्ष व सदस्य यांनी दिलेल्या भेटी | ८ |
| ४. | साधन सामुग्री | १० |
| ५. | उदाहरणात्मक प्रकरणे | ११ |
| ६. | शासनाने अनुपालन केलेल्या तसेच नाकारलेल्या शिफारशी. | १७ |

## अध्याय-परिचय

मानवाधिकार म्हणजे मूलभूत अधिकार आणि स्वातंत्र्य जो जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या प्रत्येक व्यक्तीचा वारसा हक्क आहे, यात मानवाचा वंश, लिंग, राष्ट्रीयत्व, वंशावळी, भाषा, धर्म किंवा इतर कोणतीही स्थिती असो हे सर्व मनुष्यांच्या मालकीची आहे.

२४ ऑक्टोबर १९४८ रोजी जगातील संयुक्त राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघटनांच्या अंगीकार करून संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेत दिनांक १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी अधिकार (युडीएचआर) स्वीकारला होता व घोषणा पत्र जाहीर केले हे मानवी हक्कांबद्दलच्या ऐतिहासिक पाउल होते. संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस यांनी नमूद केले होते की दोन महायुद्धादरम्यान जगाने लाखो मानवी जीव गमावले आणि मानवी रक्तपात झाले. सबब दस्तऐवज मानवी अधिकारांचे उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध सुरक्षित रक्षण प्रदान करतात. यूडीएचआरच्या अनुच्छेद १ मध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "सर्व मानवजात जन्म आणि अधिकारांमध्ये समान आहेत. ते तर्क आणि विवेकाने समृद्ध आहेत आणि बंधुत्वाच्या भावनेने एकमेकांबरोबर कार्य करावे". आमच्या संविधानाच्या निर्मात्यांनी भारताच्या संविधानांत मूलभूत अधिकार म्हणून यूडीएचआर तरतुदीचा देखील अवलंब केला आहे. भारतीय संसदेने मानवाधिकार कायदा १९९३ रोजी पारित करून मानवी अधिकाराचे संरक्षण केले. हा कायदा मानवाधिकारांचे उल्लंघन करण्याऱ्या विरूद्ध न्याय देत आहे आणि या अधिनियमात राष्ट्रीय आणि राज्य मानवाधिकार आयोग तसेच जिल्हा पातळीवरील मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आणि मानवाधिकार कायदा, १९९३ च्या संरक्षणानुसार ६ मार्च २००१ रोजी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.

### आयोगाची रचना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही एक कायद्याने निर्माण केलेली स्वायत्त वैधानिक संस्था आहे.

- या आयोगाचे अध्यक्षपद एका उच्च न्यायालयाच्या निवृत्त मुख्य न्यायमूर्ती यांचेकडे असते.
- एक सदस्य- जे उच्च न्यायालयात न्यायमूर्ती आहेत किंवा होते असे न्यायमूर्ती किंवा महाराष्ट्र राज्यात जिल्हा न्यायाधीश या पदावर कमीतकमी ७ वर्षे कार्यरत असलेले न्यायाधीश असतात.
- एक सदस्य- ज्यांना मानवी हक्कांबाबत ज्ञान आहे किंवा त्यासंदर्भात प्रत्यक्ष अनुभव आहे अशा व्यक्तींमधून एका व्यक्तीची सदस्य म्हणून नेमणूक केली जाते.

### आयोगाची कार्ये -

लोकसेवकांकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या उल्लंघनावर नजर ठेवणे आणि त्यासंदर्भात त्यांची चौकशी करणे.

मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ च्या कलम १२ च्या तरतुदीप्रमाणे या आयोगाला खालील सर्व किंवा त्यापैकी कोणतेही कार्ये करावी लागतात.

(अ) कोणत्याही व्यक्तीने दाखल केलेल्या फिर्यादीबाबत त्याने/तिने केलेल्या विनंती अर्जाची दखल घेऊन स्वतःहून पुढाकार घेऊन खालील विषयाची तपासणी करणे.

- मानवी हक्कांचे प्रत्यक्ष उल्लंघन किंवा उल्लंघनास प्रोत्साहन देणे/साथ देणे.
- सरकारी नोकरदारांद्वारे अशा प्रकारच्या मानवी हक्कांच्या उल्लंघनास प्रतिबंधित करणे.

(ब) न्यायालयासमोर अनिर्णितावस्थेत असलेल्या कोणत्याही मानवी हक्कांच्या उल्लंघन संबंधित खटल्यामध्ये न्यायालयाच्या संमतीनुसार हस्तक्षेप करणे.

(क) राज्य सरकारला पूर्वसूचना देऊन सरकारच्या अखत्यारित असणाऱ्या कोणत्याही कारागृहास अथवा इतर अशा कोणत्याही संस्थेस जिथे व्यक्तींना स्थानबद्ध केले आहे तिचे उपचार, संरक्षण अथवा सुधारणेसाठी दाखल केले आहे, अशा ठिकाणी तेथे दाखल केलेल्या व्यक्तींच्या राहणीमानाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी भेट देईल आणि त्यासंबंधी शिफारस करील.

(ड) मानवी हक्कांच्या संरक्षणार्थ राज्यघटनेद्वारे अथवा इतर कोणत्याही कायद्याद्वारे केलेल्या सुरक्षात्मक उपायांचा आणि तरतुदींचा आढावा घेऊन त्याच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे.

(इ) मानवी हक्कांच्या उपभोगामध्ये प्रतिबंध करणाऱ्या दहशतवादी कृत्यास असलेल्या घटकांचे, पुनर्विलोकन करून त्यावर उचित सुधारात्मक उपाय योजनांची शिफारस करणे.

(फ) मानवी हक्कांसंबंधीचे करार व आंतरराष्ट्रीय स्त्रोतांचा अभ्यास करून त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे.

(ग) मानवी हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेणे व अशा संशोधनास प्रोत्साहन देणे.

(ह) समाजाच्या विविध घटकांमध्ये मानवी हक्कांबाबत साक्षरतेचा प्रसार करणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्रे व इतर उपलब्ध साधनांद्वारे या हक्कांच्या संरक्षणासाठी असलेल्या सुरक्षात्मक उपायांबाबत जागृती वाढवणे.

(य) मानवी हक्कांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या गैरशासकीय स्वयंसेवी संस्था आणि इतर संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

(ज) मानवी हक्क संवधर्नासाठी आवश्यक असणारी इतर कोणतीही कामे करणे.

**तक्रारी कशाप्रकारे दाखल करता येईल ?**

(अ) तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेमध्ये लिहून दाखल करता येते. अशी तक्रार ज्या व्यक्तींचे मानवी हक्काचे उल्लंघन झाले आहे, अशी पीडित व्यक्ती किंवा तिच्या वतीने इतर व्यक्तीला ती तक्रार आयोगाच्या कार्यालयात स्वतः येवून किंवा टपालाने पाठवून दाखल करता येते.

(ब) तक्रार दाखल करण्यासाठी कोणतेही शुल्क/फी आकारले जात नाही. कोर्ट फी स्टॅम्प लावावे लागत नाहीत. वकीलाची नेमणूक करण्याची आवश्यकता नाही.

(क) अशी तक्रार ही कोणत्याही लोकसेवकाच्या विरूद्ध असावी लागते आणि ती तक्रार आयोगाचे माननीय अध्यक्ष किंवा सचिव यांच्या नावे करणे आवश्यक आहे आणि अशा तक्रारीत तक्रारदाराने खालील माहिती नमूद करणे आवश्यक आहे :—

१. तक्रारदाराचे पूर्ण नाव.

२. तक्रारदाराचा पूर्ण पत्ता.

३. दूरध्वनी क्र./ई-मेल

४. घटनेची तारीख आणि ठिकाण.

५. घटनेची वेळ.

६. मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबत सविस्तर माहिती.

७. तक्रार कोणत्या लोकसेवकाविरूद्ध/सरकारी विभागाविरूद्ध/शासकीय प्राधिकाऱ्यांविरूद्ध/सरकारी संस्थेविरूद्ध.

८. तक्रारीतील प्रकरणासंदर्भात कोणत्याही न्यायालयात किंवा राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली किंवा कोणत्याही एखाद्या कायदेशीर मंचासमोर प्रलंबित आहे काय किंवा कसे याची माहिती.

९. तक्रारीत आयोगाकडून मागणी करण्यात आलेली मदत.

**आयोगाने कोणकोणत्या बाबींकडे लक्ष केंद्रीत करावे—**

आयोगाचे प्रयत्न असेल कि आयोग राज्याच्या जनतेपर्यंत पोहचून जनतेचे मानवी हक्कांचे संरक्षण सुनिश्चित करून खालील तरतुदींच्या बाबतीत कार्यवाही करावी.—

- बेकायदेशीर स्थानबद्धता आणि वेठबिगारांच्या बाबतीत पुनर्विचार करून नागरिकांच्या बाबतीत मानवी अधिकाराच्या मानवी अधिकार उपभोगण्यासाठी सुधारणांच्या उपायोजनांची शिफारस करणे.
- स्त्रिया आणि मुले.

- शारीरिक आणि मानसिकदृष्टया अपंग व्यक्ती यांचे हक्क.
- कायदा शिकणारे विद्यार्थी आणि मानवी हक्कासंदर्भात काम करणाऱ्या अशासकीय संस्था.
- निवारा मिळविण्याचा हक्क.
- स्वास्थ्य आणि पर्यावरण.
- ज्येष्ठ नागरिक.
- राज्य सरकारच्या विविध योजनांची अंमलबजावणी.
- जनमानसात मानवी हक्कांची जागृती आणि प्रसार.

**आयोगाकडे जाण्याचे फायदे :**


| | | |
|---|---|---|
| संस्थानिक स्वायत्त | सहज पोहचणे | निशुल्क सेवा |
| कमी त्रासाची प्रक्रिया | जलदगतीने न्याय | व्यावसायिक वकिलाची मदत घेण्याची आवश्यकता नाही. |

## अध्याय २-आयोगाने हाताळलेली प्रकरणे


१ एप्रिल २०१४ ते ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत आयोगाने ४५३५ तक्रारी स्वीकारल्या. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने विनियमन २०११ चे कलम १२ नुसार बऱ्याचश्या तक्रारी दखलपात्र नाहीत किंवा त्या आयोगाच्या कार्यकक्षेबाहेरच्या आहेत असे आढळण्याने त्यावरून हे स्पष्ट होते की लोकांमध्ये आयोगाबाबत जनजागृती कमी आहे. त्याबद्दल आयोगाकडून वेगवेगळी व्याख्याने आयोजित करून आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल तसेच कार्याबद्दल जनजागृती केली जाते. खालील तक्ता हा आयोगात प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी तसेच निकाली निघालेल्या प्रकरणाबद्दल माहिती दाखवते.

**०१/०४/२०१४ ते ३१/१२/२०१४ या कालावधीतील प्रकरणांची सांख्यितिक तक्ता**

| पूर्वीची प्रलंबित प्रकरणे | नवीन प्राप्त झालेली प्रकरणे | चालू वर्षातील एकूण प्रकरणे | चालू वर्षातील एकूण बंद प्रकरणे | एकूण तक्रार निवारण | वर्षाअखेरीस प्रलंबित प्रकरणांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १५९६० | ४५३५ | २०२२५ | १७६१ | १५ | १८४६४ |




**एकूण तक्रार निवारण — १५**




**तक्रारींचे स्वरूप**

पोलीस दलाविरूद्धच्या तक्रारी—या तक्रारीमध्ये समाविष्ट असलेल्या तक्रारीचा गैरवापर,

गुन्हा नोंद करण्यास निष्काळजीपणा, गैरकायदेशीर अटक—**११४० प्रकरणे**

इतर शासकीय विभागांविरूद्ध—**४१ प्रकरणे**

कैदयांचे मानवी हक्क उल्लंघनासंबंधीच्या तक्रारी—**३५ प्रकरणे**

न्यायालया विरूद्धच्या तक्रारी—**१८ प्रकरणे**


खाजगी व्यक्तिविरूद्ध तक्रारी—**३७ प्रकरणे**

नोकरी विषयसंबंधीच्या तक्रारी—**४४४ प्रकरणे**

मागासवर्गीय जाती-जमाती व इतर अल्पसंख्याक यांच्यावर झालेल्या अन्यायाविरूद्धच्या तक्रारी—**२२ प्रकरणे**

महिलांविरूद्ध हिंसा व अन्यायासंबंधीच्या तक्रारी—**८८ प्रकरणे**

इतर तक्रारी—**२७१० प्रकरणे**





➢ शासकीय विभाग ज्यामध्ये तक्रारी या शेतीसंबंधीत, जंगल, प्रकृती, आदिवासी, पर्यावरणाविरूद्ध, अन्न, महसूल विभागाविरूद्ध इत्यादी.

➢ इतर तक्रारी ज्यामध्ये तक्रारी या इतर शासकीय विभागांविरूद्ध, बँक, पालिकेच्या विरोधात, कौटुंबिक वाद, वसुली दलाल, कर्जाबाबत इत्यादी.

**एकूण तक्रारी — ४५३५**

**एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीतील कोर्ट दालन क्र. १,२ आणि ३ मधील एकूण निकाली काढलेल्या प्रकरणांची संख्या**

| कालावधी | लिमिनी | १७(i)(b) | सुनावणी होऊन बंद झालेली प्रकरण | शिफारशी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल २०१४ ते डिसेंबर २०१४ | १४५२ | ७९ | २१५ | १५ | १७६१ |



## अध्याय III मा. अध्यक्ष आणि मा. सदस्य यांनी दिलेल्या भेटी

**१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत मा. अध्यक्ष आणि मा. सदस्य यांनी कारागृह आणि पोलीस स्टेशन येथे दिलेल्या कार्यालयीन भेटी.**

| अ.क्र. | भेटी दिलेल्या तारखा | भेटी दिलेली ठिकाणे | भेट देण्याचा हेतू |
|---|---|---|---|
| १ | १४/०५/२०१४ | कोल्हापूर | पोलीस अधिक्षक, सहायक पोलीस आयुक्त, जिल्हा कारागृह अधिक्षक आणि कळंबा मध्यवर्ती कारागृहातील जेलर यांच्याशी झालेला संवाद. |
| २ | ०७/०६/२०१४ | नाशिक | सिन्नर पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण येथे दिलेली अचानक भेट. |
| ३ | १३/०६/२०१४ | पुणे | विश्रामबाग पोलीस स्टेशन, फरासखाना पोलीस स्टेशन येथे अचानक केलेली पाहणी तसेच तपासणी. |
| ४ | १४/०६/२०१४ | कोल्हापूर | (१) पोलीस अधिक्षक यांच्याशी केलेली चर्चा. |
| | | | (२) जुना राजवाडा पोलीस स्टेशन येथील अचानक केलेली पाहणी तसेच तपासणी. |
| | | | (३) करवीर पोलीस स्टेशन येथे अचानक केलेली पाहणी तसेच तपासणी. |
| ५ | २६/०६/२०१४ | अकोला | सिव्हील लाईन आणि कोतवाली पोलीस स्टेशन, अकोला येथे दिलेली भेट. |
| ६ | २७/०६/२०१४ | बुलढाणा | शेगाव पोलीस स्टेशन येथे दिलेली अचानक भेट. |
| ७ | ०२/०७/२०१४ | पुणे | देहू रोड पोलीस स्टेशन, पुणे (ग्रामीण) येथे दिलेली अचानक भेट. |
| ८ | ०३/०७/२०१४ | पुणे | लोणीकाळभोर पोलीस स्टेशन, पुणे (ग्रामीण) येथे दिलेली अचानक भेट. |
| ९ | १८/०७/२०१४ | नाशिक | इगतपुरी पोलीस स्टेशन येथे दिलेली अचानक भेट |
| १० | १९/०७/२०१४ | अहमदनगर | राजूर पोलीस स्टेशन येथे दिलेली अचानक भेट. |
| ११ | २९/०१/२०१५ | सांगली | सांगली जिल्हा कारागृहे येथे केलेली अचानक पाहणी तसेच तपासणी. |
| १२ | ३०/०१/२०१५ | कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हा कारागृह येथे केलेली अचानक पाहणी तसेच तपासणी. |
| १३ | १५/०३/२०१५ | अहमदनगर | राहुरी आणि एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे केलेली अचानक पाहणी तसेच तपासणी. |
| १४ | २७/०३/२०१५ | ठाणे | ठाणे मध्यवर्ती कारागृह येथे केलेली अचानक पाहणी तसेच तपासणी. |


**१ एप्रिल २०१४ ते ३१ मार्च २०१५ या कालावधीत मा. सदस्यांनी सेमिनार परिषद आणि महत्वाच्या कार्यक्रमात दाखवलेली उपस्थिती.**

| अ.क्र. | कार्यक्रमांच्या तारखा | कार्यक्रमांची स्थळे | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | ०८/०६/२०१४ | अहमदनगर | राहता, अहमदनगर येथील संवेदनशील कार्यक्रम. |
| २ | ०८/०८/२०१४ | मुंबई | ग्रामीण भागातली युवा विकास कार्यक्रमात अशासकीय संघटनांतर्फे युवक बिरादरीच्या कार्यक्रमाचे केलेले उद्घाटन. |
| ३ | १५/०९/२०१४ | दिल्ली | मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींच्या समस्या आणि महाराष्ट्रातील स्थापन झालेल्या यूएसच्या फव्वाराच्या घरांच्या मॉडेलची संभाव्यता यावर चर्चा करण्यासाठी मेपल हॉल नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या भारत निवास केंद्रावर झालेली चर्चा. |
| ४ | १७/०९/२०१४ | मुंबई | डॉ. एलन डोयले शैक्षणिक संस्थापक आणि सायरस नापोलीटानो - सदस्य, फाऊटन हाउस, न्यु यॉर्क, डॉ. तपास कुमार रॉय- सेवाक, डी. रतीवा सेन गुप्ता मुख्य मानसोपचारतज्ज्ञ, सेवाक, डॉ. राजेंद्र शिरसाट - ठाणे मानसिक रूग्णालय अधिष्ठाता, श्री. नितीन शिवडे सामाजिक कार्यकर्ता ठाणे मानसिक रूग्णालय, श्रीमती शुभदा मेहेत्रा - वैदयकीय मानसोपचारतज्ज्ञ, टीआयएसएस मुंबई, श्री. सत्यजीत मोहंती - नेपच्युन फाऊंडेशन, मानसिक आजारी व्यक्तींचा पुर्नविकास याबाबत महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, नार्वे मुंबई यांनी चर्चा केली. |
| ५ | २७/०९/२०१४ ते २८/०९/२०१४ | हरियाणा | हरियाणा मानवाधिकार आयोगाने राज्य मानवाधिकार परिषदेचे आयोजन केले. |
| ६ | ०१/११/२०१४ | पुणे | भारती विद्यापीठ, पुणे येथे मूट कोर्ट स्पर्धा आयोजित केली. |
| ७ | १३/११/२०१४ | दिल्ली | एनएचआरसी यांनी कैद्यांच्या विकासाबाबत आंतरराष्ट्रीय सेमिनार आयोजित केला. |
| ८ | ०३/०२/२०१५ | मुंबई | महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या जागेत अध्यक्ष हरियाण आणि आंध्र प्रदेश मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष यांच्याशी मानवी हक्कांबाबतच्या विषयाबाबत बैठक होऊन झाली. |
| ९ | २१/०२/२०१५ | मुंबई | मानवी हक्कांबाबत जागृतीसाठी लाला लजपतराय कॉलेजचे विदयार्थी यांच्याशी संवाद साधला. |
| १० | २८/०२/२०१५ | मुंबई | मानवी हक्कांबाबत जागृतीसाठी मिठीबाई विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. |
| ११ | १३/०३/२०१५ | मुंबई | मानवाधिकारांवर जागरूकतेबद्दल वाय बी चव्हाण केंद्रात रत्नागिरीच्या वकिलांनी संवाद साधला. |
| १२ | १४/०३/२०१५ | अहमदनगर | ———— |
| १३ | २०/०३/२०१५ | हरियाणा | ———— |
| १४ | २८/०३/२०१५ | ठाणे | वीपीएम ठाणे विधि महाविद्यालय येथील वार्षिक कार्यक्रम. |

## अध्याय ४ साधन सामुग्री

### सन २०१४ -२०१५ या आर्थिक वर्षात शासनाकडून प्राप्त झालेला निधी

| | रुपये (हजारांमध्ये) |
|---|---|
| वेतनेतर अनुदान | २०९८६ |
| बिगर वेतन अनुदान | ४८६६ |
| एकूण | २५८५२ |



## अध्याय—५ उदाहरणात्मक प्रकरणे

१. प्रकरण क्र. १७/२०१३ सुओ मोटो प्रकरण परस्पर–

उत्तरवादीचे नाव :

(अ) जिल्हा अधिकारी : रायगड

(ब) पोलीस अधीक्षक : रायगड

आदेशाचे दिनांक : २ एप्रिल, २०१४.

तक्रारीचे स्वरूप.— सदर प्रकरण सुओ मोटो -स्वधिकार / वर्तमानपत्राच्या अहवालाच्या आधारे नोंदविण्यात आले आहे की, गाव खाजनी, ता. रोहा, जि. रायगड येथील ग्रामवासियांनी दिनांक २३ डिसेंबर २०१३ रोजी एका महिलेस वाळीत टाकले होते. गावकऱ्यांनी ज्यांचे राजकीय वैमनस्य आहे, त्यांनी उक्त महिलेस तिच्या नातेवाईकांसह मारहाण केली व काही गावकऱ्यांनी त्या महिलेचा विनयभंग केला त्यामुळे त्या महिलेच्या मानवी अधिकारांचा भंग करून महिलेला खुलेआम जनतेपुढे नग्न केले. असेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्यांनी रोहा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. परंतु रोहा पोलीस यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

आयोगाने संबंधित पोलीस व जिल्हा अधिकारी, रायगड यांना नोटीस बजावली व त्यांनी सदर प्रकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तपशिलावर अहवाल सादर करण्यास आयोगानी कळविले होते. उप विभागीय अधिकारी यांनी तपशीलावर अहवाल आयोगास सादर केला आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, वरील दुर्दैवी घटना त्यांचे आपआपसातील राजकीय स्पर्धेमुळे घडली आहे. परंतू सादर केले आहे की, पोलिसांनी माहिती प्राप्त होताच सदर घटनेच्या बाबतीत तात्काळ कार्यवाही केली आहे.

**आयोगाचा निर्णय :**

आयोगाने या गंभीर मानव अधिकारांच्या उल्लंघनाची नोंद घेतली असून ज्यामध्ये खुलेआम जनतेपुढे पीडितास नग्न केले. तसेच गुन्हा नोंद करण्यास पोलिसांनी विलंब केला. सबब, राज्यास निर्देशीत करण्यात आले आहे की, रू. ५०,००० इतकी रक्कम सदर आदेशाच्या प्राप्तीच्या दिनांकापासून चार आठवड्यांच्या कालावधीत पीडितास प्रदान करून अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

२. प्रकरण क्र. २२/२०१३-१४ (स्वधिकार) :

तक्रारकर्त्याचे नाव : सुर्यकांत गोपाळ सुर्वे

उत्तरवादीचे नाव :

(१) उप पोलीस आयुक्त, लोअर परेल, मुंबई.

(२) वरीष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई.

(३) पोलीस शिपाई, भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई.

**आदेशाची तारीख** : १० एप्रिल, २०१४

**तक्रारीचे स्वरूप :** सदर प्रकरण दिनांक १८ फेब्रुवारी २०१४ च्या वर्तमानपत्रामध्ये छापलेली बातमी "महाराष्ट्र टाईम्स" च्या अहवालावर आधारीत असून ही व्यक्तीनामे श्री सुर्यकांत सुर्वे यांना गैर कायदेशीररित्या पोलिसांनी त्यांना अडवून ठेवले व निर्दयीपणे पोलीस शिपाई सचिन शहाजी घाडगे यांनी दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजी त्यास मारहाण केली असून. सदर प्रकरण स्वाधिकारान्वयेआयोगाने नोंदवून घेतला आहे. तद्नंतर श्री. सुर्यकांत सुर्वे यांनी स्वतः आयोगाकडे तक्रार नोंदविली त्यात त्यांनी नमुद केले आहे की त्यांना पोलीसांनी, त्याचा कोणताही दोष नसताना निर्दयीपणे मारहाण केली. जेणेकरून त्याच्या मानवी अधिकाराचा उल्लंघन केले. विशेषतः सर्वोच्च न्यायालयानी व राज्य मानवी हक्क आयोगाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शन तत्त्वाचे उल्लंघन केले.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

सदर प्रकरणात एक गंभीर स्वरूपाचा आरोप असल्याने आयोगाने अहवाल मागविला होता व संबंधित प्राधिकाऱ्यांनी अहवाल सादर करून तक्रारकर्त्याचे सर्व आरोप नाकारले.

**आयागाने केलेली कार्यवाही :**

वेगळया परिस्थितीच्या पार्श्वभूमीचे आधारे जे यापूर्वी नोंदविले आहे की, पोलीस शिपाई सचिन घाडगे यांनी तक्रारकर्त्यास निर्दयीपणे मारहाणीच्या बाबतीत ज्याचे परिणाम गंभीर स्वरूपाच्या जखमा तक्रारकर्त्याच्या कानावर दुष्परिणाम झाले आहे. परिणामतः कानावर झालेल्या मारहाणीमुळे तक्रारकर्त्यांची ऐकण्याची क्षमता कमी झाली व अंगठयावरील जखमा ज्यांची आवश्यकता तक्रारकर्त्यांस संगीत साधन वाजवता कंपन निर्माण करण्यासाठी उपयुक्त आहे त्या जखमा भरून येतील व पुन्हा सर्वसाधारण माणसासारखा होईल, परंतू त्यांना मानसिक दुःख व त्या मारहाणीमुळे त्यांनी यातना सहन केली आहे. त्यामुळे आयोगानी राज्य सरकारला निर्देश दिले आहे की तक्रारकर्त्यास रू. १,५०,००० इतकी रक्कम सदर आदेशाच्या प्राप्तीच्या दिनांकापासून चार आठवडयाच्या आत भरपाईपोटी प्रदान करावीत अनुपालन अहवाल आयोगास सहा आठवड्यांत दयावे.

३. प्रकरण क्र. -४५५०/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : श्रीमती सुरेखा जगताप

उत्तरवादीचे नाव : पोलीस अधिक्षक, पुणे

आदेशाचे दिनांक : ५ मे, २०१४

**तक्रारीचे स्वरूप :**

सदर तक्रारीचे स्वरूप असे आहे की, पोलीस यंत्रणेने योग्य कार्यवाही आरोपीच्या विरूध्द न केल्याने सदर गंभीर चुकीच्या दुर्लक्षपणाचा असून व्यक्तिगत तक्रारकर्त्यांच्या मुलीचे आरोपीने अपहरण करून तिच्यावर बलात्कार केला व चोरीचा गुन्हा तक्रारकर्त्यांच्या मुलीवर केला.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

आयोगाने संबंधित पोलीसांच्या व्यवहाराच्या बाबतीत आपली नाराजी व्यक्त केली. आयोगाने आपले मत जाहीर केले आहे की, स्पष्ट निर्देश असतानाही संबंधित पोलीसांनी उपलब्ध पुराव्याच्या आधारे कार्यवाहीचे निर्णय स्वतःनी घ्यायचे आहे, परंतू तसे पोलीसांनी केले नाही.

**आयोगाचे निर्णय :**

आयोगाच्या मतानुसार सदर प्रकरण पीडीताच्या बाबतीत एक स्पष्ट मानव अधिकार उल्लंघनाचा प्रकार आहे. जो एक अपराध आहे, सबब, ह्या प्रकरणी खालीलप्रमाणे आयोगाने शिफारस केली आहे :-

(अ) राज्य शासनाने सुनिश्चित करावे की जेव्हा केव्हा दखलपात्र गुन्ह्याची तक्रार प्राप्त होईल, तेव्हा कोणत्याही प्रकारे वेळेचा अपव्यय न करता प्रकरणाची नोंद घ्यावी व प्रथम खबरी अहवाल तयार करून प्रकरणाची चौकशीकरून आरोपपत्र न्यायालयात सादर करावे.

(ब) अशा प्रकारचे आयोगाचे निर्देश निर्गमित करण्यात आले आहे त्यावरून असे दिसून आले आहे की, मुख्य पोलीस शिपायाच्या विरूध्द कार्यवाही करण्यात आली नाही असे निष्कर्ष काढून असे निर्देश देण्यात येत आहे की तात्काळ कर्तव्यात चूक करणारे मुख्य पोलीस शिपायाच्या विरूध्द कार्यवाही करावी.

(क) आयोगाने चौकशीच्या काढलेल्या स्पष्ट निष्कर्षाच्या आधारे असे स्पष्ट झाले आहे की तक्रारकर्त्यास झालेल्या सुनावणीत कार्यवाही करण्यात आली नाही त्यामुळे तक्रार प्राप्त झालेल्या दिवसापासून व तक्रार गहाळ झाल्याच्या दिनांकापासून आजपर्यंत आयोगास आवश्यक वाटतो की आदेश पारित करावे की पीडितास अंतरिम भरपाई च्या रूपाने रू. १,००,००० इतकी रक्कम पीडितास प्रदान करावे. सदर आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून चार आठवड्यांत सदर रक्कम प्रदान करावी व सदर आदेशाचे अनुपालन अहवाल आयोगास सादर करावे.

४. प्रकरण क्र. ३४५४/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : मोहम्मद रईस खान

उत्तरवादीचे नाव :

१. पोलीस आयुक्त, मुंबई

२. सचिव, महिला व बाल कल्याण.

३. वरिष्ठ पोलीस निरीक्षक - धारावी पोलीस ठाणे, मुंबई.

**आदेशाचे दिनांक - २२ मे २०१४**

**तक्रारीचे स्वरूप :**

सदर तक्रार धारावी पोलीस ठाण्यात अनावश्यक सतावणी मारहाणीशी संबंधित आहे. त्यात असे आरोप आहे की, दिनांक २२ सप्टेंबर २०११ रोजी, मध्यरात्री धारावी पोलीस ठाण्याचे दोन पोलीस शिपाई त्यांच्या एका अधिकाऱ्यासह व दोन व्यक्तिसह नावे जाहीर रौस मोहम्मद व रियाज पीडिताच्या घरी आले व त्यांनी पीडितास पोलीस ठाण्यात नेले व तिथे निर्दयीपणे त्याला मारहाण केली. पुढे असे ही आरोप करण्यात आले आहे की त्यास निर्दयीपणे शिवीगाळ करून त्यांच्यातल्या वादाचे तिथे त्यास एका कोपऱ्यात बसण्यास भाग पाडले व त्याला धमकी दिली की जो पर्यंत तो त्यांच्यातल्या वादाचे समेट घडवून आणावे व जोपर्यंत समेट घडवून आणत नाही जाहीर यांच्या संबंध असलेल्या कुविख्यात गुन्हेगार डॉन दाऊद सौदी अरेबीयातील यांच्याशी आहेत तो तुमची काळजी घेईल त्यात तो एका खुनाच्या प्रकरणात तुम्हाला गुंतवू शकतो.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

गंभीर स्वरूपाचे आरोप असल्याने आयोगाने संबंधित प्राधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला सदर प्राधिकाऱ्यांनी केलेला तक्रार-अर्जात नमूद केलेल्या आरोपीने तक्रारकर्त्याचे आरोप नाकारले

**आयोगाचा निर्णय :**

तपशीलवारनिहाय चौकशी करून शेवटी आयोगाने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या :—

(अ) राज्य शासन विशेषतः गृह विभाग, पोलीस महासंचालक व वरीष्ठ सेवा अधिकारी जसे आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व त्यांच्यापेक्षा वरीष्ठ असलेले अधिकाऱ्यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शन तत्त्वांचा व इतर राज्य मानवी हक्क आयोग व राज्य आयोगाच्या शिफारशींचा व डी के बासु प्रकरणात केलेल्या शिफारशीचा खालच्या स्तरावर अवलंब करण्यासाठी संवेदनशीलता आणखी जसे पोलीस उप निरीक्षक सहायक पोलीस निरीक्षक या अधिकाऱ्यांमध्ये संवेदनशीलता आणावी जेणेकरून मानव अधिकारांना संरक्षण मिळेल. आजच्या मितीला संवेदनशीलतेचा जनतेस मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

(ब) राज्य शासन यांनी संवेदनशीलता त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून अहवाल आयोगाकडून मागविला जाईल तेव्हा वरीष्ठ अधिकारी जसे उप पोलीस आयुक्त, सहायक पोलीस आयुक्त यांची जबाबदारी आहे की, त्यांनी स्वतंत्रपणे पूर्ण चौकशी करून मानवी अधिकारांचा उल्लंघन झाला किंवा कसे, या बाबतीत अहवालाबरोबर आपले स्वतंत्र मत काय आहे, ते नमूद करावे केवळ पोलीस शिपाई यांनी म्हंटले ते पुनरूत्पादन न करता स्वतंत्र मत मांडावे.

(क) प्रकरणाच्या असाधारण सत्यता व परिस्थितीचा विचार करून आयोग रू. १,००,००० इतकी रक्कम अंतरिम भरपाई तक्रारकर्त्यास मंजूर करीत आहे व सदर आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून चार आठवड्यांत सदर रक्कम प्रदान करावी व सदर आदेशाचे अनुपालन अहवाल आयोगास सादर करावे.

५. प्रकरण क्रमांक - ३९४/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : मधुकर बाबुराव देवकाते

उत्तरवादीचे नाव : पोलीस अधीक्षक, बीड

**आदेशाची तारीख :- २७ मे २०१४**

**तक्रारीचे स्वरूप :**

सदर प्रकरणाची तक्रारीची नोंदणी दिनांक २४ मार्च २०११ एका व्यक्तिद्वारे नावे मधुकर बाबुराव देवकाते झाली. यात त्यांनी आरोप केले की उप पोलीस निरीक्षक श्री. ए. ओ. पठान ग्रामीण पोलीस ठाणे यांनी त्यांना मारहाण केली असे आरोप करण्यात आले की तक्रारकर्ता व्यक्ति एका हॉटेल चालवित असून व अंदाजे रात्री ११-०० वाजता पोउनि त्यांच्या हॉटेलात आले व तक्रारकर्त्यास मारहाण केली, कारण हॉटेलमालक त्याना कोणतेही पैसे देत नाही व रात्री उशीरापर्यत हॉटेल चालवितात.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

आयोगाने नोटिस काढून संबंधित प्राधिकाऱ्यांकडून अहवाल मागविला व पोलीस अधिकाऱ्यास निर्देशित केले की, त्यांनी नव्याने चौकशी करून त्यांनी मयत इसमास झालेल्या जखमाच्या बाबतीत तात्काळ एमएलसी नोंदी करून त्यात मारहाणीत झालेल्या जखमांचा इतिहास नमूद करून अहवाल मागविला.

**आयोगाने घेतलेला निर्णय :**

तपशीलनिहाय चौकशीअंती असे निदर्शनास आले की सदर प्रकरणी अक्षम्य मानव अधिकाराचा उल्लंघन झाले आहे. सबब, आयोगाने खालीलप्रमाणे शिफारस केली आहे :—

(अ) राज्य शासन यानी सुनिश्चित करावे की पोलीस अधिकाऱ्यानी नागरिकांच्या मानवी अधिकाराच्या संरक्षणासाठी गंभीररित्या संवेदनशील असावे व त्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयानी व डी. के. बसू व इतर प्रकरणात दिलेल्या निर्देशनाचा काटेकोरपणे पालन करावे.

(ब) जखमेचे प्रकार लक्षात ठेवून व वस्तुस्थिती कि मारहाणीच्या असंबंधित कारणामुळे मोठा कालावधीनंतर पीडीत मृत झाला. सबब, आयोग कोणत्याही प्रकारचे नुकसानभरपाई प्रस्ताव करीत नाही.

६. प्रकरण क्रमांक - ३५२८/२००७-०८

तक्रारकर्त्याचे नाव : प्रेमकुमार बाथम

उत्तरवादीचे नाव : उप पोलीस आयुक्त<br>
वरीष्ठ पोलीस निरीक्षक<br>
व पोलीस निरीक्षक, मुंबई.

**आदेशाचे दिनांक :** ७ जुलै २०१४

**तक्रारीचे स्वरूप :**

सदर तक्रार श्री. सुरेश पाटिल माजी पोलीस निरीक्षक भोईवाडा पोलीस ठाणे यांच्या विरूध्द करण्यात आली होती त्यात असे खोटे आरोप करून त्यांना गुंतविण्यात आले होते. गैर कायदेशीर अटक करून त्यांना अडकवून ठेवण्यात आले होते त्यामुळे मा. उच्च न्यायालयांचे व डी. के. बसूच्या प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शन तत्त्वाचा उल्लंघन करण्यात आले आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

आयोगानी नोटिस निर्गमित करून व संबंधित पोलीसांनी उत्तर देऊन संगनमताचे आरोप व गैरकायदेशीर अटक व मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शनाचे उल्लंघनाचे आरोप नाकारले.

**आयोगाचा निर्णय :**

तपशील निहाय चौकशी अंती आयोगाने खालील प्रमाणे शिफारशी केल्या आहे :-

(अ) राज्य शासन/गृह विभाग यानी योग्य कार्यवाही श्री. सुरेश पाटील, पोलीस निरीक्षक यांचे विरूद्ध श्री रामकुमार याच्या व त्यांचे बंधु ह्यांची दिनांक १८ सप्टेंबर २००६ रोजी तक्रार न नोंदविण्याच्या बाबतीत व तक्रारीत नमूद व्यक्तिच्या विरूद्ध कार्यवाही न करण्याबाबतीत त्याच्या पूर्वग्रहच्युत कार्यवाहीसाठी प्रारंभ करावे.

(ब) ह्यात गंभीर मानव अधिकार हक्काच्या उल्लंघनाच्या बाबतीत रू. ७५,०००/- इतकी रक्कम नुकसान भरपाईपोटी तक्रारकर्त्यास प्रदान करावे. राज्यशासन सदर रकमेची वसूली श्री. सुरेश पाटील, पोलीस निरीक्षक यांच्या कडून वसूल करण्यास पात्र आहे.

(क) नुकसान भरपाईची रक्कम सदर शिफारशीच्या प्राप्तीच्या दिनांकानंतर आठ आठवडयात करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन आठवड्यात आयोगास सादर करावा.

७. प्रकरण क्र. ५/२०१४ सुओ मोटो तक्रार (परस्पर)

उत्तरवादीचे नाव-

१. आयुक्त, महिला व बाल कल्याण विभाग, पुणे

२. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. बाल सहाय्य संस्था, मुंबई.

आदेशाचे दिनांक : १५ जुलै, २०१४

**तक्रारीचे स्वरूप :**

सदर प्रकरण सुओ मोटो (स्वधिकार) रीत्या वर्तमान पत्राच्या महाराष्ट्र टाइम्स च्या अहवालाच्या आधारे दखल घेऊन नोंदविण्यात आले आहे. या अहवालातं असे नमूद करण्यात आले आहे कि, अपुऱ्या आरोग्य सेवे मुळे फक्त एकच स्थायी डॉक्टर मानखुर्द परिसरात ८०० मुलांसाठी पाच संस्थेत उपलब्ध आहे.

**आयोगाने केलेली कार्यवाही :**

संबंधित प्राधिकाऱ्यास नोटीस निर्गमित करून अहवाल मागविण्यात आले होते. त्यांच्याकडून एक तपशीलनिहाय अहवाल सादर करण्यात आला आहे, त्यात नमूद करण्यात आले आहे कि ह्या ५ संस्थेत मुलांची मंजूर संख्या अदाजे १५०० मुले आहेत. व सध्या ७१५ मुले तिथे रहात आहेत असेही नमूद करण्यात आले आहे कि एमडीसी होम येथे एक पूर्णवेळ वैद्यकीय अधिकारी असून तीन परिचारिका एक औषध मिश्रकाचे पद आहेत. शिवाय एक भेट देणारा दाताचा डॉक्टर, एक भेट देणारा मानसिक रोग डॉक्टर व एक भेट देणारा पॅथोलॉजिस (रोग निदान तज्ज्ञ) उपलब्ध आहे व एक संस्था सोडून दुसऱ्या संस्थेत रुग्ण खाटा पुरविण्यात आले आहे. असेही नमूद करण्यात आले होते कि आवश्यकतेप्रमाणे जवळच्या रूग्णालयाची मदत घेतली जाते. या सर्व प्रत्येक दवाखान्यात क्लिनिक स्थापित करण्यात आले आहे व ते जवळच निर्माण करण्यात आले आहे. फक्त चेंबूर बाल गृह येथे एक वेगळी क्लिनिक होती. ते एमडीसी च्या जवळ असल्याने मुलांना वैद्यकिय सेवा एमडीसीच्या रुग्णालयात दिली जाते.

**आयोगाने घेतलेला निर्णय :**

आयोगाने संपूर्ण चौकशी करून खालील प्रमाणे शिफारशी केल्या :-

(अ) राज्य महिला व बाल कल्याण विभाग यांनी सहा आठवड्यात तपशीलनिहाय माहिती जसे एकूण बाल कल्याण संस्थाची प्रत्येक जिल्ह्यातील मंजूर संख्या, अस्तित्वातील संस्था (मुले -मुली वेगळी) व त्यांच्यासाठी उपलब्ध वैद्यकीय सुविधा कळवाव्यात.

(ब) राज्य शासनानी आवश्यक वैद्यकिय कर्मचारी उपलब्ध करून द्यावे. चेंबूरच्या पाच बालगृहात वर नमूद केल्याप्रमाणे कमीत एक वैद्यकिय अधिकारी, एक निवासी परिचारीका व एक दिवसात सेवा करणारी परिचारीका व एक औषध मिश्रक उपलब्ध करावे.

(क) शिवाय वैद्यकिय कर्मचारी, स्वच्छता ठेवण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्यांची ५ दवाखान्यासाठी सेवा उपलब्ध करावी.

(ड) आवश्यक वैद्यकिय संयत्र व साधन सामग्री जसे की फर्निचर, खाटा, रेफ्रिजरेटर इ. उपलब्ध करावे.

(इ) राज्य शासनाने तात्काळ चेंबूर बाल गृहात दवाखाना योग्य कर्मचारीसह निर्माण करावे व तिथे इतर आवश्यकता वर नमूद केल्याप्रमाणे सेवा उपलब्ध करावे.

८. प्रकरण क्रमांक - २३७३/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : तुकाराम गवई

उत्तरवादीचे नाव :

(१) सचिव, उर्जा विभाग.

(२) अधीक्षक, अभियंता, एमएसईडीसीएल , बुलढाणा.

**आदेशाचे दिनांक : १४/०७/२०१४**

**शिफारशी :**

(१) एमएसईडीसीएल यांनी अनधिकृत होणारी गैरकायदेशीर जोडणीचा चोरीची नियमितपणे तपासणी करावी.

(२) एमएसईडीसीएल यानी अंतरिम भरपाई रू. १,००,०००/- इतकी रक्कम तक्रारकर्त्यास प्रदान करावी.

९. प्रकरण क्रमांक :- ३५०४/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : दोस्सा हनिफ

उत्तरवादीचे नाव : उप पोलीस आयुक्त परिमंडळ, गृह विभाग.

**आदेशाचे दिनांक- १३/११/२०१४**

**शिफारस :**

पोउनि याच्या विरूद्ध त्यांनी केलेल्या कर्तव्याच्या चुकीसाठी शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

१०. प्रकरण क्रमांक - १३६५/२०११-१२

तक्रारकर्त्याचे नाव : छाया कोळी

उत्तरवादीचे नाव : एसीएस, जीएडी

**आदेशाचे दिनांक : २१/११/२०१४**

शिफारशी :

(१) चौकशी करून आवश्यक कार्यवाही करावी. कि एसआरपीएफ - गट- ४ यांनी सर्व औपचारिकतेचे अनुपालन का केले नाही.


(२) एसीएस गृह विभाग यांनी संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यास निर्देश द्यावे कि त्यांनी चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध आवश्यक कार्यवाही करावी.

| अध्याय - ६ शासनाने अनुपालन केलेल्या तसेच नाकारलेल्या शिफारशी | | |
|---|---|---|
| आदेश तारीख | शिफारस | अहवालांची पूर्तता/स्वीकारलेली पत्र |
| ११.१२.२०१३ | तहसीलदाराने तक्रारदाराला संधी देऊन आणि आयोगाला ते कळविल्यानंतर चौकशी पूर्ण केली. | सावनेर तहसीलदार यांचा दिनांक ३०/०४/२०१४ चा चौकशी अहवाल प्राप्त झाला त्या अहवालात त्यांनी म्हंटले आहे की चौकशीपूर्ण झाल्यानंतर ग्रामसभा निर्णयाप्रमाणे तक्रारदाराचे नाव बीपीएल यादीमधून कमी करून बीपीएल यादी सुधारण करण्यात आली आता बरोबर असल्याचे सांगितले. |
| २१.०१.२०१४ | डी. के. बासु आणि इतर खटले याबाबत राज्य आणि गृह यांनी मार्गदर्शन तत्वे पोलीसांसाठी दिली आहेत. राज्याने तक्रारदारास रु. ५०,०००/- हजारांची नुकसान भरपाई द्यावी. | (१) डी. के. बासु समितीने दिलेल्या मार्गदर्शन तत्वाची अंमलबजावणी केली नाही.<br>(२) रु. ५०,००० रुपयांची नुकसानभरपाई<br>(१) गृह विभाग यानी रु. ५०,००० रुपये मंजूर केल्याबाबतचा दि. १९/०३/२०१४ चा फॅक्स बीडचा पोलीस अधीक्षकांकडून प्राप्त झाला.<br>(२) १८/०७/२०१४ ला पोलीस अधीक्षक बीड यांनी पाठविलेले पत्र प्राप्त झाले कि, गृहखात्याने लवकरात लवकर रु. ५०,०००/- नुकसान भरपाई द्यावी.<br>(३) १३/०८/२०१४ चे पत्र तसेच ०३/०७/२०१४ गृह विभागाचा शासन निर्णय ज्यामध्ये तक्रारदारास ५०,०००/- रुपये नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. प्राप्त झाले.<br>(४) २४/०९/२०१४ चे पत्र एपीआय. गव्हाने ह्याच्याकडून ५०,०००/- रुपये वसूल करण्याबाबतचे दि. २४/०९/२०१४ चे पत्र बीडच्या पोलीस अधिकाऱ्याकडून जे जालना पोलीस अधिकाऱ्याला उद्देशून लिहिण्यात आले होते. |
| १८/११/२०१३<br>आणि<br>०८/०१/२०१४ | (१) लक्ष्मीबाई काळे ह्यांच्या कुटुंबियांना १ लाख ५० हजार रुपये नुकसानभरपाई अदा करावी.<br>(२) नाशिक जिल्ह्यातील घराच्या नुकसान भरपाई साठी २-५ हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी.<br>(३) अमृत वाघचौरे यांच्या कुटुंबियाला १ लाख ५० हजार इतक्या रक्कमेच्या नुकसान भरपाई देण्यात आली.<br>(४) अहमदनगर जिल्ह्यातील मृत मालकांना २५,००० रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. | (१) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी पाठविलेले पत्र प्राप्त झाले कि ज्यामध्ये असे म्हटले होते की, अहमद नगर जिल्ह्यातील दिलेल्या सूचनांचे अनुपालन अहवाल लवकरात लवकर आयोगाला पाठवावे.<br>(२) विभागीय आयुक्त यांनी दि. ०३/०२/२०१४ रोजी लिहिलेले पत्र प्राप्त झाले कि, ज्यामध्ये राज्य सरकारकडून आवश्यक निर्देशाची मागणी केली आहे.<br>(३) दिनांक २१/०७/२०१४ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक यांनी मदत व पुर्नवसन यांना लिहिलेले पत्र प्राप्त झाले कि, ज्यामध्ये योग्य मार्गदर्शन मागितले.<br>(४) महसूल व वन विभाग यांच्या कडून अनुपालन अहवाल प्राप्त झाला कि त्यांनी नैसर्गिक आपत्तीबाधक व्यक्तींना नुकसान भरपाई दिली आहे. |


| | | |
|---|---|---|
| २९/०४/२०१४ | (१) निवृत्ती वेतनाची अद्यावत थकबाकी तक्रार कर्त्यास प्रदान करण्यात यावी.<br>(२) आयुक्त, बीएमसी यांनी संबंधितांच्या विरूद्ध चौकशी करून योग्य कार्यवाही करावी.<br>(३) तक्रारदारास बीएमसी रु.५०,०००/- इतक्या रक्कमेची भरपाई निवृत्ती वेतना अतिरिक्त रक्कमेची करावी. | (१) मुख्य कार्यकारी अभियंता, घन कचरा बीएमसी यांचे दि. ११/०६/२०१४ चे पत्र प्राप्त झाले. सदर पत्रात नमूद करण्यात आले आहे की तक्रारकर्त्याच्या कुटुंबसेवा निवृत्ती वेतन लेख्यात रु. २,४३,१७५/- इतकी रक्कम थकबाकी पोटी जमा करण्यात आली आहे व रु. ५०,०००/- इतकी रक्कम नुकसान भरपाई पोटी दि. ०४/०७/२०१४ रोजी इसीएस द्वारे स्थानांतर करण्यात आले आहे. |
| २८/११/२०१३ | राज्य शासनानी या विषयी लक्ष घालून पोलीस अधिकाऱ्यांच्या विरूद्ध कार्यवाही करून पुरेशी शिक्षा द्यावी. | (१) उप पोलीस आयुक्त, परिमंडळ - १० यांच्या कडून दि. १६/१०/२०१४ चे अहवाल प्राप्त झाले. त्यात मा. उच्च न्यायालयानी आदेश या पूर्वीच पारीत केले कि, सीआर क्र. १०६/२०१२ चौकशी करावी, त्यात आवश्यक चौकशी करून पोलीस अधिकाऱ्यांना शिक्षा करण्यात आली. सबब याच विषयावर चौकशी करणे नैसर्गिक न्यायाचा उल्लंघन होईल. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.




HUMAN RIGHTS DAY
Celebrating 20 years


STAND UP


MAHARASHTRA STATE HUMAN RIGHTS COMMISSION
HUMAN RIGHTS DAY
10th December, 2016
STAND UP

